(18) 5101

# उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा जि. नंदुरबार यांचे कार्यालय

( आस्थापना शाखा )

दुरध्वनी क्रमांक - (02565) 227733
ई-मेल आय. डी - sdm.shahada@gmail.com
जुने तहसिल कार्यालय आवार, शहादा
ता. शहादा जि. नंदुरबार - 425409

**वाचले**: १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ चे प्रकरण १०, नियम ११८
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांकःसेनिवे/१०९९/३४/सेवा-४, दिनांक ०२/०२/१९९९
३) तहसिलदार अक्राणी यांचेकडील पत्र क्रमांक/आस्था/कावि-३९२/२०२१ दिनांक ११/१२/२०२१
४) तहसिलदार शहादा यांचेकडील पत्र जा.क्र.आस्था/कावि-५६८/२०२१ दिनांक २२/१२/२०२१

उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा

क्रमांक/आस्था/कावि- ३११ /२०२१

दिनांक २४ / १२ / २०२१

## अधिसुचना

ज्याअर्थी, माहे जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा जि. नंदुरबार यांच्या आस्थापनेवरील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे वर्ग-३ तलाठी कर्मचारी यांचा तपशील खालीलप्रमाणे तक्त्यात नमुद केला आहे.

शासन नियमानुसार सेवानिवृत्त होणारे वर्ग-३ चे कर्मचारी यांचे संदर्भात .वय ५८ वर्षे एव्हढी वयोमर्यादा निश्चित केलेली असल्याने अधिनस्त तहसिल कार्यालय, शहादा व अक्राणी यांनी उपोदघोषातील नमुद वाचले क्रमांक-३ व ४ अन्वये उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने खालील तलाठी (वर्ग-३) कर्मचारी यांची त्यांच्या नावासमोरील रकाना क्र. ५ च्या दिनांकास सेवानिवृत्तीस पात्र आहेत.

| अ.क्र. | सेवार्थ आय. डी. | तलाठी कर्मचा-याचे संपूर्ण नाव. पदनाम व कार्यालय | जन्मतारीख | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | REVRRRM६४०४ | श्री. राजेंद्र रोहिदास रोकडे, तलाठी कुसूमवाडे, तहसिल कार्यालय शहादा | ०१/०६/१९६४ | ३१/०५/२०२२ |
| २ | REVSCAM६५०१ | श्री. शांतीलाल छोटूलाल अहेर, तलाठी तोरणमाळ, तहसिल कार्यालय अक्राणी | ०१/०१/१९६५ | ३१/१२/२०२२ |

उक्त तक्त्यात नमुद असल्याप्रमाणे सेवानिवृत्त होणारे तलाठी (वर्ग-३) कर्मचारी यांची शासकीय सेवेविषयक माहिती संबंधीत कार्यालय प्रमुखांनी तपासुन मुळ सेवापुस्तकावरुन खात्री करावी व विसंगती आढळल्यास तात्काळ इकडील कार्यालयास खुलासा करावा. तसेच सेवानिवृत्तीकामी खालील नमूद असलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी.

१) सर्व तहसिलदार शहादा व तहसिलदार अक्राणी यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सेवानिवृत्त होणाऱ्या तलाठी (वर्ग-३) कर्मचारी यांना सेवानिवृत्तीच्या तारखेस कार्यालयांतर्गत व्यवस्था करुन न चुकता कार्यमुक्त करावे. तसेच आदेशातील दर्शविलेली संबंधीतांची जन्मतारीख याबाबत त्यांचे मुळ सेवापुस्तकावरुन खात्री करावी. त्यात तफावत असल्यास तसे या कार्यालयास विनाविलंब कळविण्यात यावे.

२) वरीलप्रमाणे सेवानिवृत्त होणारे तलाठी (वर्ग-३) कर्मचारी यांची यादी आपल्या कार्यालयात कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणुन द्यावी व त्यांना समज दिल्याबाबतची पोहोच आपल्या दफ्तरी ठेऊन तसा अहवाल इकडेस विनाविलंब सादर करावा.

जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
शाखा :- पुरवठा
3 JAN 2022
ते.उ.जि
जिल्हाधिकारी

३) वरीलप्रमाणे सेवानिवृत्त होणारे तलाठी (वर्ग-३) कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त आपल्या कार्यालयातील कोणत्याही तलाठी (वर्ग-३) कर्मचारी यांचे नाव सदर यादीमध्ये समाविष्ठ करावयाचे राहीले नाही. याबाबत मुळ सेवापुस्तकावरुन खात्री करावी. तसे न केल्यास व तलाठी (वर्ग-३) कर्मचारी सेवानिवृत्त व्हावयाचे राहिल्यास याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत तहसिलदार यांची राहील.

४) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्रमांक पीईएस/१०७६/१२३९/७६ मधील तरतुदीनुसार प्रत्येक शासकीय एखादा अधिकारी / कर्मचाऱ्यास त्यांच्या नियत वयोमानाने सेवानिवृत्तीची तारीख माहित असणे आवश्यक आहे. जर एखादा अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्तीच्या तारखेनंतर सेवेत राहील व अशी सेवानिवृत्तीची तारीख संबंधीत कार्यालय प्रमुखांनी सक्षम अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणुन न दिल्यास व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची सेवा चालु राहिल्यास संबंधित कार्यालय प्रमुख / अधिकारी हे कार्यवाहीस पात्र ठरतील. सदरची बाब सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावी.

५) सेवानिवृत्त होणारे तलाठी (वर्ग-३) कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी चालू अथवा प्रलंबित आहे किंवा कसे? तसेच त्यांचेकडुन कोणत्याही प्रकारची शासकीय येणे बाकी आहे काय? याचा खुलासा करावा. तसेच सरकारी येणे बाकी असेल तर ती वसुल करण्याची कार्यवाही करावी. तसेच विभागीय चौकशी चालु अथवा प्रस्तावित असल्यास त्याबाबतची सद्यस्थिती कळवावी. सेवानिवृत्त होणाऱ्या तलाठी (वर्ग-३) कर्मचारी यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी किंवा शिस्तभंगाची कारवाई सुरु असेल अथवा प्रस्तावित असेल तर ती सेवानिवृत्ती दिनांकानंतरही चालविणेत येईल व ती महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम २४(४) प्रमाणे कार्यवाहीस पात्र व बंधनकारक राहील. तसेच त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सरकारी वसूली येणे बाकी निघाल्यास ती रक्कम त्यांच्याकडुन वसूलीस ते पात्र राहतील.

६) सदर सेवानिवृत्त होणारे तलाठी (वर्ग-३) कर्मचारी यांची सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे तयार करण्याची कार्यवाही सहा महिने अगोदर सुरु करणे आवश्यक असुन तशा सुचना वेळोवेळी दिलेल्या आहेत. तरी सेवानिवृत्त होणारे कर्मचारी यांना सेवानिवृत्ती वेतनादी लाभ वेळेत प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी.

७) सेवानिवृत्त होणारे तलाठी (वर्ग-३) कर्मचारी हे कोणकोणत्या कार्यालयात कार्यरत होते, याबाबत सेवापुस्तकातील तपशिलानुसार ना-चौकशी व ना-देय बाबतचे अंतिम प्रमाणपत्र सर्व संबंधीत कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन निवृत्ती वेतन प्रकरण वेळीच अंतीम करणेकामी आवश्यक कार्यवाही करावी. अन्यथा होणाऱ्या विलंबास आहरण व संवितरण अधिकारी हे जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

उक्त नमुद निर्देशानुसार बिनचुक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत वेळोवेळी आवश्यक. अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.

उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा

*स्वाक्षरीत/--*
(चेतन गिरासे)
**उपविभागीय अधिकारी**
**शहादा भाग शहादा**

प्रति – सर्व संबंधितांना (कार्यालय प्रमुख यांचेमार्फत)
प्रति – तहसिलदार शहादा / अक्राणी
प्रत – मा. जिल्हाधिकारी नंदुरबार (आस्थापना शाखा) यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर
प्रत – उपकोषागार अधिकारी, शहादा / अक्राणी यांचेकडे
प्रत – म. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार यांचेकडेस

२/- सदरची अधिसुचना ही जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबारच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(चेतन गिरासे)
**उपविभागीय अधिकारी**
**शहादा भाग शहादा**